# मुंबई विद्यापीठ

**(No.GAD/ICM/2014-15/129)**

परिपत्रक :-

**संदर्भ : शासन निर्णय क्र.संकिर्ण-२००६/प.क्र.१८६/मावक-२, दिनांक २८ एप्रिल, २००६**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जन्मदिवस २६ जून प्रतिवर्षी **"सामाजिक न्याय दिन"** म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्या अनुषंगाने **गुरुवार, दिनांक २६ जून, २०१४** रोजी व्यवस्थापन परिषद दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी परिसर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८ येथे सकाळी ११.०० वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्मदिवस **"सामाजिक न्याय दिन"** म्हणून साजरा करण्याचे ठरविले आहे.

याप्रसंगी अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांचे सदस्य, विद्यापीठाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व प्राचार्य, संस्था-संचालक, विद्यार्थी-विद्यार्थीनी व शिक्षणप्रेमी बंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

मुंबई - ४०० ०३२
२० मे, २०१४

डॉ. एम. ए. खान
**कुलसचिव**

***********